महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई व उपकार्यालय वाई जि. सातारा येथे खालीलप्रमाणे ठोक मासिक मानधनावरील पदे भरण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदे कंत्राटी पध्दतीने ठोक मासिक मानधनावर भरावयाची आहेत.

१) विभाग संपादक :- **एकूण २ पदे -** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. २१,०००/-

अ) मानव्यविद्या विभाग

शैक्षणिक अर्हता :-
१) मान्यताप्राप्त भारतीय वा विदेशी विद्यापीठाची मानव्यविद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण
२) विविध मानव्यविद्या शाखांतील वेगवेगळया विषयांतील संपादकीय संशोधनात्मक काम मराठीतून करण्याचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.
३) स्वतंत्र संशोधनात्मक लेखन/संपादन वा वैचारिक ग्रंथलेखन असल्यास प्राधान्य.

ब) विज्ञान व तंत्राविद्या विभाग

शैक्षणिक अर्हता :-
१) मान्यताप्राप्त भारतीय वा विदेशी विद्यापीठाची विज्ञान व तंत्राविद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण
२) विविध विज्ञान व तंत्राविद्या शाखांतील संशोधनात्मक काम मराठीतून करण्याचा किमान ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.
३) स्वतंत्र संशोधनात्मक लेखन/संपादन वा वैचारिक ग्रंथलेखन असल्यास प्राधान्य.

२) सह संपादक :- **एकूण ३ पदे ,** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. १४,०००/-

अ) मानव्यविद्या विभाग :-

शैक्षणिक अर्हता :-
१) मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची मानव्यविद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.
२) विविध मानव्यविद्या शाखांतील वेगवेगळया विषयांतील संपादकीय संशोधनात्मक काम .मराठीतून करण्याचा किमान ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.
३) स्वतंत्र संशोधनात्मक लेखन/संपादन वा वैचारिक ग्रंथलेखन असल्यास प्राधान्य

ब) विज्ञान व तंत्रविद्या विभाग

शैक्षणिक अर्हता :-
१) मान्यताप्राप्त भारतीय वा विदेशी विद्यापीठाची विज्ञान व तंत्रविद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.
२) विविध विज्ञान व तंत्रविद्या शाखांतील संशोधनात्मक काम मराठीतून करण्याचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.
३) स्वतंत्र संशोधनात्मक लेखन/संपादन वा वैचारिक ग्रंथलेखन असल्यास प्राधान्य.

३) कला संपादक :- **१ पद** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. ८०००/-

शैक्षणिक अर्हता :-
१) किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.
२) चित्रकलेतील शासनमान्य पदविका
३) रेखाचित्रे, छायाचित्रे व निर्देशक चित्राकृती तयार करण्यातील नैपुण्य.
४) मराठी व इंग्रजीचे उत्तम ज्ञान आवश्यक.

अनुभव :-
१) व्यावहारिक कलागृह किंवा प्रकाशन संस्थेतील किमान ५ वर्षाचा अनुभव.
२) पुर्ननिर्मितीसाठी निर्देशक कलाकृती तयार करणे.
३) वेगवेगळया मुद्रण पध्दतीचे आणि लेआउट करणे.

४) प्रमुख चित्रकार :- **१ पद** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. ७५००/-

शैक्षणिक अर्हता :-
१) किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण.
२) चित्रकलेतील शासनमान्य पदविका.
३) चित्राकृती, चित्रतक्ते व निर्देशक चित्राकृती इ. कलाविषयक नैपुण्य.
४) मराठी व इंग्रजीचे उत्तम ज्ञान आवश्यक.

अनुभव :-
१) टायपोग्राफी, लेआऊट, लेटरिंग आणि पुस्तक सजावटीच्या कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव
२) कलाविषयक कामांचे नमुने तयार करुन ती पूर्ण करण्याचा अनुभव.
३) व्यावसायिक कलागृह किंवा प्रकाशन संस्थेतील किमान ३ वर्षांचा अनुभव.
४) स्पेगनच्या साहायाने छायाचित्रांना छटा देणे व ती सफाईदार करण्याच्या कामाचा अनुभव.

५) प्रमुख मानचित्रकार :- **१ पद** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. ८४००/-

शैक्षणिक अर्हता :-
१) भारतीय सर्वेक्षण विभाग (सर्व्हे ऑफ इंडिया) यांचा किमान १ वर्षाचा अभ्यासक्रम किंवा तत्सम अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. किंवा चित्रकलेतील शासनमान्य पदविका
२) मराठी व इंग्रजीचे उत्तम ज्ञान आवश्यक.

अनुभव :-
१) मानचित्र रेखाटन/नकाशे तयार करणे यासंबंधीचा कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.तसेच त्यासंबंधीच्या प्रकाशन संस्थेतील अनुभव.

५) सहाय्यक मानचित्रकार :- **१ पद** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. ६४००/-

शैक्षणिक अर्हता :-
१) भारतीय सर्वेक्षण विभागाचा अल्पमुदतीचा अभ्यासक्रम किंवा तत्सम अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.
२) मराठी व इंग्रजीचे उत्तम ज्ञान आवश्यक.

६) संदर्भ सहाय्यक : **१ पद** एकत्रित मासिक ठोक मानधन रु. ५८००/-

शैक्षणिक अर्हता :-
१) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण व ग्रंथपाल विषयांतील पदविका.
२) मराठी व इंग्रजीचे उत्तम ज्ञान आवश्यक.

अनुभव :-
१) ग्रंथपालन, सूचिकरण या कामाचा अनुभव.

अर्ज पाठविण्याचा पत्ता व :- **सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, रविंद्र नाटयमंदिर, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.**

अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत :- दिनांक १२ ऑगस्ट, २०१३. (कार्यालयीन वेळेत)

सर्वसाधारण सूचना :

१) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, अनुभवाचे प्रमाणपत्र इत्यादींच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.
२) अर्जदाराने अर्जासोबत स्वत:चे अलिकडील छायाचित्र चिकटवावे व त्यावर उमेदवाराने स्वत:ची स्वाक्षरी करावी.
३) उमेदवारांस मुलाखतीस स्वखर्चाने हजर रहावे लागेल.
४) अपूर्ण अर्ज, विचारात घेतले जाणार नाहीत.
५) उमेदवाराने ज्या पदाकरिता अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव लिफाफयावर ठळक अक्षरात लिहावे.
६) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज पाठविण्यात यावा.

सचिव,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

सचिव,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
रवींद्र नाटयमंदिर, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी,
मुंबई 400025.

कार्यालयीन नोंदणी क्रमांक (कार्यालयीन कामासाठी)	
.	अर्जाचा क्रमांक

उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत छायाचित्र येथे चिकटवावा व सही करावी.

1) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नांव :- ----------

2) उमेदवाराचे नांव :- ---------- ---------- ----------
आडनांव प्रथम नांव मधले नांव

3) जन्म दिनांक :- ----------

4) लिंग (स्त्री / पुरुष) :- ----------

5) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ----------

---

6) दूरध्वनी (एसटीडी कोडसह) :- ----------

7) भ्रमणध्वनी **व ई-मेल** :- ----------

8) शैक्षणिक अर्हता (उतरत्या क्रमाने महत्तम अर्हता आधी व त्यानंतर खालच्या अर्हतेची नोंद करावी.)

अ.क्र.	अर्हता	शैक्षणिक वर्ष	बोर्ड	गुणांची टक्केवारी
1				
2				
3				
4				
5				

9) ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या संदर्भाने अनुभव असल्यास त्याचा उल्लेख करावा व साक्षांकित कागदपत्रे जोडावीत.

अ.क्र.	कालावधी	पदाचे नांव	ज्या संस्थंमध्ये काम केले त्या संस्थेचे नाव	कामाचे स्वरुप

प्रकटीकरण :

मी खालील सही करणार प्रमाणित करतो की, 1) अर्जात उल्लेखलेली माहिती व जोडलेली कागदपत्रे ही संपूर्णपणे खरी आहेत. यात भविष्यात काही विसंगती आढळल्यास मी नोकरी गमवण्यास व फौजदारी गुन्हयास पात्र राहील, याची मला जाणीव व माहिती आहे. 2) सदरच्या पदावरील नियुक्ती ही कंत्राटी व हंगामी स्वरुपाची असून तिचा सेवाकालावधी हा एकावेळेस अकरा महिन्यांपेक्षा जास्त नाही याची मला जाणीव व माहिती आहे. 3) अकरा महिन्याचा कालावधी संपल्यावर मला परत नियुक्ती मिळण्याचा माझा हक्क राहणार नाही याची मला जाणीव व माहिती आहे. 4) सदरच्या पदावर माझा कायमपणाचा हक्क असणार नाही. याची मला जाणीव व माहिती आहे. 5) सदर भरती प्रक्रियेत नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय अंतिम आहे. याची मला जाणीव व माहिती आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराचे नांव व सही